# प्रेरणा Prerana

को-ऑप बँक लि. CO-OP BANK LTD.

मुख्य कार्यालय : लक्ष्मणनगर, डांगे चौक, थेरगांव, पुणे – ४११ ०३३


## * पाहिजेत – असि. क्लार्क *

संपूर्ण महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र व ₹ ६५० कोटी + व्यवसाय असलेल्या तसेच संपूर्ण Core Banking Solution व विविध डिजीटल चॅनेल वापरत असलेल्या बँकेत आपले करिअर घडवू इच्छिणाऱ्या पदवीधारकांकडून असिस्टंट क्लार्क पदाकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

### * पात्रता *

१) वाणिज्य शाखेचा पदवीधर (बी.कॉम/एम.कॉम.)

२)MS-CIT/ समतुल्य प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक.

३) **प्राधान्य** –JAIIB/CAIIB/GDC&A उत्तीर्ण तसेच शासन मान्यता प्राप्त इतर संस्थेची(ICM,IIBF,VAMNICOM इ.) बँकिंग/सहकार/कायदेविषयक पदविका.

४) वयोमर्यादा : २२ वर्षे ते ३५ वर्षे

५)संगणकावर काम करता येणे आवश्यक तसेच संगणकावर मराठी, इंग्रजी टायपिंग येत असल्यास प्राधान्य

६) बँका/पतसंस्था किंवा इतर वित्तीय संस्थामधील कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य

७) पुणे जिल्ह्यातील उमेदवारांना प्राधान्य

### * अर्ज करण्याची पद्धत व निवड प्रक्रीया *

१) उमेदवाराने प्रथम सर्व सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात व त्यानंतर विहीत नमुन्यात अर्ज पाठवायचा आहे.

२) महाराष्ट्र शासन सहकार पणन व वस्त्रोध्योग विभाग यांचे कडील दि.२१/०१/२०१९ दि.२९/११/२०२१, सहकार आयुक्त यांचे कडील दि.२४/०३/२०२२ व दि.१४/०६/२०२२ रोजीचे आदेशान्वये सहकारी बँकांतील नोकर भरती प्रक्रिया शासन नियुक्त संस्थेद्वारेच करणे बंधनकारक आहे.

३) त्यानुसार प्रेरणा को–ऑप बँक लि., डांगे चौक, थेरगांव, पुणे –४११०३३ या बँकेसाठी आवश्यक असलेले असि. क्लार्क पदासाठीची भरती प्रक्रिया सहकार आयुक्तांचे पॅनेल वरील कोल्हापुर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि. कोल्हापुर यांचे मार्फत राबविली जाणार आहे.

---

४) उमेदवारांनी लेखी परीक्षेसाठी असोसिएशनच्या व बँकेच्या संकेत स्थळावर (वेब साईट) प्रसिद्ध केलेल्या नमुन्यातच अर्ज असोसिएशनच्या खालील पत्त्यावर पोस्टाने / कुरीअरने पाठवावेत. अर्जासोबत संपुर्ण बायोडाटा, फोटो, शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्राच्या झेरॉक्स कॉपीज जोडाव्यात.

असोसिएशनचा पत्ता : कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि.
१४५८/बी, जी.एन. चेंबर्स, कोळेकर तिकटी, मंगळवार पेठ,
कोल्हापूर –४१६ ०१२

५) उमेदवारांनी अर्ज पाठवताना लखोट्यावर व अर्जावर **“ प्रेरणा को–ऑप बँक लि, पुणे या बँकेसाठी अर्ज“** असा उल्लेख करावा.

६) परीक्षा लेखी स्वरुपाची असेल.

७) लेखी परीक्षा १०० मार्काची व बहुपर्यायी असणार आहे. पासिंग साठी किमान ४० मार्क्स मिळविणे आवश्यक आहे. परीक्षेचे स्वरुप व अभ्यासक्रम साधारण IIBF च्या धरतीवर आधारीत आहे. परीक्षेचा नमुना पेपर सोबत जोडला आहे.

८) परीक्षेची तारीख, वेळ, ठिकाण व परीक्षेचे ब्रॉशर उमेदवारास त्याच्या मेल आयडीवर पाठविले जाईल. सबब मेल आयडी अर्जात अचूक लिहावा. सदर परीक्षेचे आयोजन कोल्हापुर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि. कोल्हापुर यांचे मार्फत पुणे येथे केले जाणार आहे.

९) तोंडी मुलाखतीचे आयोजन प्रेरणा को–ऑप बँक लि. यांचे मार्फत केले जाईल.

१०) लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची यादी असोसिएशन व बँकेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध केली जाईल. उत्तीर्ण उमेदवारांना मेरीटनुसार प्रत्यक्ष मुलाखतीस बोलविले जाईल.

११) लेखी परीक्षेसाठी रु. ५००/– अधिक १८% जीएसटी या प्रमाणे परीक्षा शुल्क (विना परतीची) आकारले जाणार आहे. उमेदवाराने परीक्षा शुल्क ₹ ५००/– + ९०/– (१८% जीएसटी) = ५९०/– स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेच्या Timber Market Kolhapur शाखा IFSC Code : SBIN0005550, MICR Code : 416002008 वर कोल्हापूर जिल्हा नागरी सहकारी असोसिएशन लि. यांचे **चालु ठेव खाते** (CURRENT A/C) **क्र. ४०१६८२०८०५७** मध्ये IMPS / NEFT ने भरावे. व त्याच्या युटीआर / ट्रँझ्यक्शन नं. चा उल्लेख विहीत नमुन्यातील अर्जात करणे आवश्यक आहे.

१२) जे उमेदवार परीक्षा शुल्क भरुन त्याचा युटीआर / ट्रॅझ्यक्शन नं. व रक्कम भरल्याची तारीख याचा उल्लेख विहीत नमुन्यातील अर्जात करतील त्यांचेच अर्ज पात्र धरले जातील.

१३) मुलाखतीमध्ये योग्य ठरणाऱ्या उमेदवारांची बँकेच्या आवश्यकतेनुसार नेमणूक केली जाईल. याबाबतचे सर्व अधिकार प्रेरणा को-ऑप बॅकेच्या संचालक मंडळाकडे राहतील.

१४) अर्ज करण्याची शेवटची मुदत दि. ०३/०९/२०२३ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत राहील.

१५) या संदर्भात अन्य कोणत्याही खुलाशासाठी बँकेच्या कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळेत असोसिएशन दुरध्वनी क्र. ०२३१-२६२७३०७/०८ किंवा बँकेचा मोबाईल क्रमांक ९०७५०२८०२२ वर संपर्क करावा.

१६) भरती प्रक्रिये संदर्भातील पुढील अपडेट मिळविणेसाठी वेळोवेळी बँकेच्या व असोसिएशनच्या वेबसाईटला भेट द्या.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**